| प्रकरण चार |
|---|
| **कृषी विभाग (परिच्छेद क्रमांक 4.484 ते 4.495)** |

**4.484 विविध योजनेअंतर्गत पुरवठा केलेल्या शिल्लक औजारांचा तपशील बाबत.**

**पंचायत समिती गुहागर, जिल्हा रत्नागिरी, सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 10)**

पंचायत समिती गुहागर, जिल्हा रत्नागिरी येथील सन 2021-22 चे लेखापरीक्षणाचे अनुषंगाने कृषी विभाग साठा नोंदवही तपासली असता आढळलेल्या अनियमिततांबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. कृषी विभाग साठा नोंदवही मध्ये नॅपसॅक स्प्रे पंप नादुरुस्त 20 नग रक्कम रुपये 12,660/-, भात मळणी यंत्र 4 नग रक्कम रुपये 45,000/-, एच.डी.पी.ई. पाईप 33 नग रक्कम रुपये 7,838/-, एच.डी.पी.ई. पाईप 172 नग रक्कम रुपये 44,548/-, पॉवर नॅपसॅक पेअर पंप 3 नग रक्कम रुपये 16,077/-, व पेट्रो डिझेल पंप नग 1 रक्कम रुपये 9,625/- अशी एकूण रक्कम रुपये 1,35,748/- गुंतून असल्याचे आढळून आले. सदर साहित्याचे वाटप करण्यात आले नाही.

2. उपरोक्त वस्तुस्थिती पाहता साठा नोंदवहीतील नोंदीवरुन एकूण रक्कम रुपये 1,35,748/- चे साहित्य विनावापर पडून आहे. याबाबत उचित कार्यवाही करणे आवश्यक आहे.

3. नॅपसॅक स्प्रे पंप 20 नग नादुरुस्त असून सदर पंप कोणी खरेदी केले अथवा वरिष्ठ कार्यालयाकडून प्राप्त झाले आहेत याबाबत खातरजमा करुन तात्काळ बदलून घेणेबाबत कार्यवाही केली नाही.

**4.485 कृषी विभागाकडील शिल्लक साहित्य साठ्याबाबत.**

**पंचायत समिती दापोली, जिल्हा रत्नागिरी, सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 24)**

पंचायत समिती दापोली, जिल्हा रत्नागिरी येथील सन 2021-22 चे लेखापरीक्षणाचे अनुषंगाने कृषी विभागाकडील साठा नोंदवही नमुना नंबर 33 ची तपासणी केली असता आढळलेल्या अनियमिततांबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पंरास/1096/प्र.क्र.178, दिनांक 09.10.1997 व शासन परिपत्रक क्रमांक डीपीआर/1088/सीआर/716/30, दिनांक 26.10.1999 नुसार लाभार्थ्यांना वस्तुंचे वाटप त्याच वित्तीय वर्षात व वेळेत होणे आवश्यक असताना तशी कार्यवाही न केल्याने पंचायत समिती दापोली यांच्याकडे सन 2014-15 पासून साहित्य शिल्लक असल्याचे आढळून आले आहे. साहित्याचे वाटप न झाल्याने जिल्हा परिषद सेस फंडातील रक्कम रुपये 32,903/- गुंतून पडलेली असून निधीचा सुयोग्य वापर झाला नसल्याचे दिसून येते.

2. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 मधील नियम 98(2) नुसार विभागाध्यक्ष प्रत्येक वित्तीय वर्षात एकदा सर्व मालसंग्रह, साधनसामग्री यांची प्रत्यक्ष पडताळणी करील आणि मालसंग्रहाची आवक व त्याचे अस्तित्व इत्यादी बाबतचे आणि मालसंग्रह नोंदवहीतील सामुग्रीची संख्या व दर्जा यांच्या अचूकपणाबद्दल, पृष्ठ किंवा अनुक्रमांक देऊन योग्य प्रमाणपत्र नोंदवून ठेवणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही.

3. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंयायत समिती लेखासंहिता 1968 मधील नियम 98(3) नुसार प्रत्येक वर्षी जून महिन्यात मालमत्ता तपासणीविषयी वरिष्ठ कार्यालयास प्रमाणपत्र पाठविणेची कार्यवाही केली नाही.

**4.486 जिल्हा परिषद सेस अंतर्गत सन 2021-22 अंतर्गत 50 टक्के किंवा मर्यादीत अनुदानावर ट्रॅक्टर पुरविणेबाबत.**

**पंचायत समिती मालेगांव, जिल्हा नाशिक सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 9)**

पंचायत समिती मालेगांव सन 2021-22 चे लेखा परीक्षणात जिल्हा परिषद सेस अंतर्गत 50 टक्के किंवा मर्यादित अनुदानावर ट्रक्टर पुरविणे योजनेवर प्रति लाभार्थी रुपये 1,00,000/- प्रमाणे 11 लाभार्थ्यांना एकूण रुपये 11,00,000/- अनुदान वितरित केले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध व मत्स्य व्यवसाय विभागाचा शासन निर्णय क्रमांक आउयो-2415/प्र.क्र. 217/4, दिनांक 05.06.2015 नुसार राबविल्या जाणाऱ्या योजनांना व्यापक प्रसिध्दी देणे आवश्यक असताना तशी कार्यवाही विभागाने केल्याचे आढळून आले नाही.

2. ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक मागास/1098/प्र.क्र.73/34 दिनांक 20/10/1999 नुसार विवरणपत्र अ मध्ये योजनेतील लाभार्थ्याची मास्टर नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. परंतु अशी नोंदवही ठेवण्यात आली नाही.

3. खरेदी साहित्य हे BIS/ISI मानांकीत असल्याचे प्रमाणपत्र केंद्र शासनाने ठरवून दिलेल्या संस्थाद्वारे प्रमाणित केल्याचे दस्तऐवज लेखा परीक्षणाकामी उपलब्ध झाले नाही.

4. लाभार्थ्यांचे प्रस्ताव तपासले असता श्री. अनिल बाळू पवार, तळवाडे व श्री. रविंद्र आनंदा जाधव, पाडळदे यांचे ड्रायव्हींग लायसन आढळून आले नाही. श्री. दादाजी राजाराम अहिरराव, सौंदाणे यांचे ड्रायव्हींग लायसनवर TR नमूद नाही, तसेच श्रीमती संगिता किशोर निकम, दाभाडी यांचे ड्रायव्हींग लायसन LMV चे आहे व त्यावर TR नमूद नाही.

**4.487 जिल्हा परिषद सेस अंतर्गत 50 टक्के मर्यादित अनुदानावर रोटॅव्हेटर पुरविणेबाबत (कृषी विभाग)**

**पंचायत समिती नांदगाव, जिल्हा नाशिक सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 10)**

पंचायत समिती नांदगांव सन 2021-2022 चे लेखापरीक्षणात जिल्हा परिषद सेस अंतर्गत 50 टक्के मर्यादित अनुदानावर रोटॅव्हेटर पुरविणेसाठी 2,25,000/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. जिल्हा परिषद कृषि विभाग / जि.प.सेस/137/20121 दिनांक 8.7.2021 च्या मार्गदर्शक सुचना अ च्या 3 नुमार रोटॅव्हेटर खरेदीनंतर रोटॅव्हेटरचा वापर करण्यासाठी ट्रॅक्टर असलेबाबतचा पुरावा म्हणुन आर.सी. बुक जोडणे आवश्यक आहे. श्रीम. मनिषा संतोष काकळेज यांच्या प्रस्तावासोबत आर.सी.बुक पुरावा म्हणुन जोडलेला नाही.

2. जिल्हा परिषद कृषि विभाग/जि.प.सेस/137/20121 दिनांक 08.07.2021 च्या मार्गदर्शक सुचना आ) नुसार पुर्वसंमती साहित्य खरेदीस पुर्वसंमती द्यावी व खरेदीची मुदत ही पुर्व संमती दिल्यानंतर 30 दिवसापेक्षा जास्त नसावी. पंचायत समिती यांनी दिनांक 14.10.2021 रोजी पुर्वसंमती दिली आहे त्यानुसार 13.11.2021 पुर्वी सर्व लाभार्थ्यांनी साहित्य खरेदी करणे आवश्यक असताना उपरोक्त लाभार्थ्यांच्या यादीमधील 5 लाभार्थ्यांनी पुर्वसंमतीनंतर 30 दिवसापेक्षा जास्त कालावधीनंतर साहित्य खरेदी केल्याचे आढळुन आले.

3. जिल्हा परिषद कृषि विभाग/जि.प.सेस/137/20121 दिनांक 08.07.2021 च्या मार्गदर्शक सुचना इ च्या 5 नुसार रोटॅव्हेटर खरेदी करताना ते BIS/ISI केंद्र शासनाने ठरवुन दिलेल्या संस्थाव्दारे प्रमाणित असावे, असे असताना 3 लाभार्थ्यांच्या प्रस्तावा सोबत जोडलेले नसताना देखिल संबधितांना लाभ देण्यात आला आहे.

4. रोटॅव्हेटर खरेदी प्रस्तावात श्री. मधुकर भाकचंद बोरसे यांनी निशिका एजन्सी मनमाड प्रमाणक दरपत्रकात (कोटेशनमध्ये) खाडाखोड करुन ते क्रमांक 308 दिनांक 20.10.2021 चे टॅक्स इनव्हॉईस असल्याचे

दर्शवुन रोटॅव्हेटर खरेदी केले आहे. तरी मुळ टॅक्स इनव्हॉईस अप्राप्त असताना सदर लाभार्थ्याला लाभ दिल्याचे दिसुन येते तरी सदर खरेदीबाबत मुळ टॅक्स इनव्हॉईस सादर केले नसल्याने संबंधिताकडुन रक्कम रुपये 25,000/- वसुल होणे आवश्यक आहे.

5. श्री. माधव लक्ष्मण काजळे यांनी श्री. मधुकर भाकचंद बोरसे यांच्या निशिका एजन्सी मनमाड प्रमाणक दरपत्रकात (कोटेशनमध्ये) खाडाखोड करुन ते क्रमांक 308 दिनांक 20.10.2021 चे टॅक्स इनव्हॉईस ची छायांकित प्रत जोडुन रोटॅव्हेटर साहित्य खरेदी केल्याचे दर्शविले आहे. तरी संबंधिताकडून रक्कम रुपये 25,000/- वसुल होणे आवश्यक आहे.

6. श्रीम. अनिता संजय पवार यांच्या प्रस्तावात जोडलेल्या आरसीबुक प्रमाणे त्यांचे 26.10.2021 रोजी ट्रॅक्टर रजिस्ट्रेशन केले आहे. त्यांना दिनांक 14.10.2021 रोजी पुर्वसंमती देण्यात आली आहे. त्यानुसार संबधित व्यक्ती ही सदर लाभास पात्र नसताना त्यांना लाभ दिल्याचे दिसुन येते. तरी संबंधिताकडुन रुपये 25,000/- वसुल होणे आवश्यक आहे.

7. जिल्हा परिषद कृषि विभाग/जि.प.सेस/137/20121 दिनांक 08.07.2021 च्या मार्गदर्शक सुचना नुसार यापुर्वी लाभ दिलेल्या शेतकऱ्यांना योजनेचा पुन्हा लाभ देण्यात येवु नये. दुबार लाभार्थी निवड होणार नाही. याची दक्षता घ्यावी श्रीम. अनिता संजय पवार यांना सन 2020-21 मध्ये ट्रॅक्टर खरेदीसाठी लाभ दिल्याचे लाभार्थी नोंदवहीवरुन दिसुन आले.

8. जिल्हा परिषद सेस अंतर्गत 50 टक्के किंवा मर्यादित अनुदानावर साहित्य व अवजारे वाटप पात्र लाभार्थी निवड यादी तपासली असता श्री. रविकांत रामचंद्र शेवाळे व श्री. संतोष दादा सानप यांचे नाव लाभार्थी निवड यादीत नसताना लाभ देण्यात आला आहे.

**4.488 जिल्हा निधीतून 75 टक्के अनुदानावर शेतक-यांना कृषी औजारे यंत्रे संदर्भात थेट लाभ हस्तांतरणाबाबत. पंचायत समिती पुरंदर, जिल्हा पुणे सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 14)**

पंचायत समिती पुरंदर सन 2021-22 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणामध्ये कृषी विभागाकडून जिल्हा निधी अंतर्गत 75 टक्के अनुदानावर कृषी औजारे यंत्रे संदर्भात लाभ देण्यात आले असून सदर योजनेवर रक्कम रुपये 31,50,000/- खर्च केला आहे. सदर खर्चातील अनियमिततेबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 मधील नियम 20 अनुसार संबंधित लाभार्थ्यांना रक्कम प्राप्त झाल्याबाबत मुद्रांकित पोहोच लेखापरीक्षणास प्राप्त झाल्या नाहीत. तसेच सदरची योजना 30 नोव्हेंबर 2021 पर्यंत पुर्ण करण्याबाबत अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडील दिनांक 09/08/2021 रोजीच्या आदेशान्वये सुचना असताना योजना वेळेत पुर्ण करणे आणि एका कुटुंबातील एकाच लाभार्थ्यास लाभ देय असताना याप्रमाणे कार्यवाही केली नाही

2. कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक जीवायो-2011/प्र.क्र. 414/पदुम-4 दिनांक 06/09/2011 नुसार 3 टक्के विकलांग लाभार्थींना व 30 टक्के महिलांना लाभ देणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही केली नाही.

3. ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास 1094/सीआर/2239/ दिनांक 01/09/1993 नुसार फलश्रुती अहवाल घेणेत आले नाही.

4. ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास-1098/प्र.क्र.73/74, दिनांक 20/10/1999 मधील 4 मध्ये नमूद केल्याप्रमाणे विवरणपत्र-अ प्रमाणे विहित नमुन्यांत लाभार्थी नोंदवही तयार करुन मागासवर्गीय जाती निहाय व गाव निहाय लाभ दिलेल्या लाभार्थी नोंदी ठेवणे आवश्यक आहे. लाभार्थी

मास्टर नोंदवहीनुसार पंचायत समिती स्तरावर वैयक्तिक लाभाच्या राबविलेल्या योजनेतील लाभार्थ्यांना सलग दोन वर्ष एकुण 3 लाभार्थ्यांना दुबार लाभ देणेत आल्याचे दिसून येते. दुबार लाभाची रक्कम रुपये 43,650/- वसुल करणे आवश्यक आहे.

**4.489 जिल्हा परिषद सेसमधुन 50 टक्के अनुदानावर शेतकऱ्यांना कडबाकुट्टी तसेच जलसिंचन साधने/मोटर खरेदी करिता अनुदान पुरविणे खर्चातील अनियमिततांबाबत.**

**पंचायत समिती करवीर, जिल्हा कोल्हापूर सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 27)**

पंचायत समिती करवीर कडील सन 2021-22 चे लेखापरीक्षणात जिल्हा परिषद सेस मधून 157 शेतकऱ्यांना कडबाकुट्टी मशीन तसेच 78 लाभार्थ्यांना इलेक्ट्रीक मोटार खरेदी या योजनांवर एकूण रक्कम रुपये 18,80,000/- अनुदान वाटपातून केलेल्या खर्चाबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2016/प्र.क्र.9वित्त-9/दिनांक 19 मे 2016 मधील अनुक्रमांक 1 व 3 नुसार योजनेच्या अंमलबजावणीसाठी योग्य नियोजन करुन निधी विहीत निकष व विहीत कालावधीत देणेची जबाबदारी जिल्हा परिषदेची आहे. योजनेतील लाभार्थ्यांना प्रत्यक्ष रकमा दिनांक 31/03/2022 च्या आधी जमा होणे आवश्यक असता रकमा मे 2022 मध्ये जमा झाल्याने विलंब झाल्याचे आढळते.

2. योजनांचे प्रशासकीय मंजुरी आदेश, संवितरण आदेश लेखापरीक्षणास उपलब्ध झाला नाही.

3. प्राप्त प्रस्ताव पंचायत समितीस प्राप्त झालेबाबत आवक क्रमांक व दिनांक नोंदविले नाहीत.

4. एकाच गावतील दोन लाभार्थींचा फोटो एकाच कडबाकुट्टी मशीन सोबत असल्याने मशीन खरेदी न करताच अनुदान अदा केल्याचे दिसून येते.

5. काही लाभार्थीचे कडबाकुट्टी मशीन सोबत फोटो नाहीत.

6. एकाच गावातील दोन लाभार्थींचा फोटो एकाच ठीकाणी एकाच मोटरसोबत सोबत दिसून येतो. त्यामुळे मोटर खरेदी न करताच अनुदान अदा केल्याचे दिसून येते.

7. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 मधील नियम 20 अनुसार संबंधित लाभार्थ्यांना रकमा प्राप्त झालेबाबत मुद्रांकित पोहोच पावती लेखपरीक्षणास प्राप्त झाल्या नाहीत.

**4.490 जिल्हा परिषद सेस कृषी विभाग अंतर्गत राबविण्यात आलेल्या योजनेतील अनियमितता.**

**पंचायत समिती वरुड, जिल्हा अमरावती, सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 7)**

पंचायत समिती वरुड यांनी सन 2021-22 मध्ये जिल्हा परिषद सेस कृषी विभाग अंतर्गत राबविण्यात आलेल्या विविध योजनांवर एकूण रुपये 3,27,500/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. योजनेच्या अमलंबजावणीस संबंधीत विभागाने योग्य नियोजन केले नाही, योजनेचे लाभ लाभार्थ्यांना वेळेत मिळेल याबाबत कार्यवाही केल्याचे दिसुन आले नाही.

2. संमती पत्राच्या तारखे पासुन 45 दिवसाचे आत कृषि साहित्याची खरेदी करणे बंधनकारक आहे. परंतु लाभार्थ्यांचे अर्जासोबत पुर्वसंमती पत्रे जोडण्यात आली नाही.

3. योजनेचा लाभ तालुक्यातील सर्व गांवाना न देता विशिष्ट गावातील लाभार्थींना लाभ दिल्याने योजनेचा प्रचार व प्रसिध्दी योग्य रित्या न झाल्याचे दिसून आले.

4. मुळ परिच्छेदात नमूद केलेप्रमाणे 3 लाभार्थ्यांना दिलेला लाभ हा योजनेच्या निकषानुसार नसल्यामुळे प्रदान लाभाची एकुण रक्कम रुपये 29,000/- वसुल पात्र आहे.

5. सदर योजनांमुळे लाभार्थ्यांचे उत्पन्नात वाढ होऊन त्यांचे जिवनमान उंचावले असल्याचे फलश्रुती अहवाल प्राप्त केले नाही. तसेच मास्टर नोंदवही ठेवली नाही. त्यामुळे लाभार्थींना दुबार लाभ दिला किंवा कसे याची खात्री करता आली नाही.

**4.491 डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजनेअंतर्गत नवीन विहीर बांधकाम, मोटरपंप, विज जोडणी/ सोलर पंप खर्चातील अनियमितता.**

**पंचायत समिती वाशिम, जिल्हा वाशिम, सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 15)**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजनेअंतर्गत सन 2021-22 मध्ये नवीन विहिर बांधकाम, मोटरपंप, विज जोडणी/सोलारपंप इत्यादींवर रक्कम रुपये 13,47,147/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. नविन विहीरीच्या कामाची पंचायत समितीने सर्वसाधारणपणे रुपये 2,50,000/- या प्रमाणे एकाच प्रकारचे 6 ते 8 मीटर व्यास असलेले व 12 मीटर खोलीच्या विहीरीचे अंदाजपत्रक तयार केले आहे. तर भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा वाशिम यांचे पत्र क्रमांक 36 दिनांक 21.01.2020 चे प्राप्त पत्रानुसार 5 मीटर व्यास व 15 मीटर खोलीची साधी विहीर घेण्याची शिफारस केली आहे. त्यामुळे अंदाजपत्रक भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा ने शिफारस केल्यानुसार तयार केली नाहीत.

2. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 67 नुसार विहीत केलेला नमुना नंबर 23 मध्ये कामाची प्रगती नोंदवही ठेवण्यात आली नाही.

3. कृषी संचालक (विस्तार व प्रशिक्षण) कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे मार्गदर्शक सुचनापत्र क्रमांक 2228 दिनांक 18 जुलै 2019 मधील सुचना क्रमांक 6.1 नुसार नविन विहीरीची आखणी करताना, निम्मे काम झालेले व विहीर पुर्णत्वाचे प्रमाणपत्र देतांना अक्षांश, रेखांश व जिपीएस लोकेशन सह फोटो घेवुन ते नस्तीसोबत जोडणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे कार्यवाही केली नाही.

4. कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध्व्यवसाय विकास मत्स्यव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-2019/ प्र.क्र.89/3अे दिनांक 15 जुलै 2019 मधील 13 नुसार योजनेंतर्गत बाबीची विहीत कालावधीत अमंलबजावणी न करणाऱ्या लाभार्थ्यांची पुर्वसंमती रद्द करावी व तदनंतर प्रतिक्षा यादीतील क्रमवारीनुसार पुढील पात्र लाभार्थ्यांची निवड करावी असे असताना एका लाभार्थ्याची निवड होवून त्यांना कार्यारंभ आदेश क्रमांक 128 दिनांक 20.01.2020 देवून सुध्दा त्यांनी मार्च 2022 अखेरपर्यंत काम सुरु केले नसल्याचे अहवालासोबत जोडलेल्या विवरणपत्रावरुन दिसून येते. त्यामुळे वर नमुद केल्याप्रमाणे त्यांचा योजनेचा लाभ रद्द करुन प्रतिक्षा यादीतील क्रमवारीनुसार पात्र असणाऱ्या पुढील लाभार्थ्यास लाभ देण्यात आला नाही.

5. दोन लाभार्थ्यांना मुदतवाढ देऊनही काम पुर्ण केले नसल्याचे दिसून येते.

6. कृषी संचालक (विस्तार व प्रशिक्षण) कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य पुणे यांचे मार्गदर्शक सुचनापत्र क्रमांक 2228 दिनांक 18 जुलै 2019 मधील सुचना क्रमांक 14 नुसार योजनेची अंमलबजावणी यशस्वीरित्या होण्याच्या दृष्टीने परिशिष्ट 2 मध्ये दर्शविल्याप्रमाणे पंचायत समिती स्तरावर कृषी अधिकारी (विघयो) यांनी तपासणी केल्याबाबतचे अहवाल नस्तीसोबत दिसून आले नाहीत.

7. लाभार्थ्याने विज जोडणी मिळण्याकरीता विज वितरण कंपनीकडे रक्कम भरल्याची पावती जोडली आहे परंतू विज जोडणी झाली किंवा नाही याबाबत पुराव्यादाखल अभिलेखे जोडले नाही.

8. सदर योजनेचा लाभ दिल्यामुळे लाभार्थ्यांच्या उत्पन्नात वाढ होऊन त्याची आर्थिक उन्नती झाली असल्याबाबत उपयोगिता प्रमाणपत्र नस्तीसोबत दिसून आले नाहीत.

**4.492 50 टक्के अनुदानावर कृषी विभागा अंतर्गत जिल्हा परिषद सेस फंडातुन वैयक्तीक लाभाच्या योजना राबविणे या योजनेचा लक्षांक पूर्ण करणेबाबत.**

**पंचायत समिती भिवापूर, जिल्हा नागपूर, सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 10)**

पंचायत समिती भिवापूर यांनी सन 2021-22 मध्ये 50 टक्के अनुदानावर कृषी विभागाअंतर्गत जिल्हा परिषद सेस फंडातुन वैयक्तीक लाभाच्या योजना राबविणे यावर रुपये 1,05,355/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. अनुदान मंजूरी आदेशातील अटी व शर्तीनुसार वस्तू / साहित्याची खरेदी मानकाप्रमाणे केल्याची पडताळणी केलेबाबत पर्यवेक्षीय कर्मचारी दिसतील असा फोटो देयकासोबत घेवून त्या संबंधी गट विकास अधिकारी यांनी प्रमाणित करावे असे निर्देश असताना अशी कार्यवाही केली नाही.

2. उपयोगिता प्रमाणपत्र व फलश्रुती अहवाल, मुल्यमापन प्रमाणपत्र नाही त्यामुळे खरेदी केलेल्या साहित्यामुळे लाभार्थी यांचे जीवनमान उंचावून योजनेचा मुळ उद्देश सफल झाल्याची खात्री होत नाही.

3. ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक 1089/प्र.क्र./55364/ दिनांक 5 ऑक्टोबर 1989 नुसार एकाच लाभार्थीस दुबार प्रदान होऊ नये या करिता कृषी विभागाने वैयक्तीक योजनाबाबत लाभार्थी मास्टर नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. विभागाने वैयक्तीक योजनेचा लाभ दिलेल्या लाभार्थ्यांचे मास्टर नोंदवही ठेवलेली आहे परंतू त्यामध्ये अद्यावत नोंदी घेण्यात आल्या नाही.

4. कृषी विकास अधिकारी यांचे पत्र क्रमांक जिपना/कृषी/753/2022/ दिनांक 10.03.2022 नुसार सन 2021-22 मध्ये एकूण 171 लाभार्थीकरीता रुपये 7,37,500/- अनुदान मंजूर असताना फक्त 24 लाभार्थ्यांना विविध योजने अंतर्गत लाभ प्रदान केला असून 147 लाभार्थ्यांना लाभ प्रदान केला नाही. त्यामुळे रुपये 6,32,145/- निधी अखर्चित राहिला आहे.

**4.493 डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना अंतर्गत लाभार्थ्यांनी केलेल्या बांधकामातील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती भंडारा, जिल्हा भंडारा, सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 12)**

पंचायत समिती भंडारा यांनी सन 2021-22 या आर्थिक वर्षात कृषी विभागाद्वारे डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना अंतर्गत 18 मंजुर लाभार्थ्यांपैकी 3 लाभार्थींच्या नविन सिंचन विहीर व इनवेल बांधकामावर एकूण रक्कम रुपये 5,60,004/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. गट विकास अधिकारी, पंचायत समिती भंडारा यांच्या पत्र क्रमांक 2165 दिनांक 23/08/2021 नुसार वैयक्तिक लाभ योजनेच्या अट क्रमांक 6 प्रमाणे लाभार्थ्यांकडे सिंचन विहीर किंवा ओलीताचे साधन नसून जमीन कोरडवाहू असणे आवश्यक आहे. मात्र दोन मंजूर लाभार्थ्यांच्या 7/12 उताऱ्याच्या तपासणीत त्यांच्याकडे कोरडवाहू शेती नसताना योजनेचा लाभ दिल्याचे आढळले. त्यामुळे संबंधित अटींचे उल्लंघन होऊन इतर पात्र लाभार्थी योजनेपासून वंचित राहिल्याचे दिसून येते.

2. श्री नाशिक दौलत वैद्य यांनी सादर केलेल्या 28/06/2021 च्या 7/12 उताऱ्यात 1.30 हे.आर. क्षेत्र अजल सिंचित भात पिकाखाली असल्याचे नमूद आहे. नवीन सिंचन विहिरीसाठी कामाचा आदेश 22/10/2021 रोजी देण्यात आला व काम 16/03/2022 रोजी पूर्ण झाले. मात्र 21/09/2021 च्या 7/12 अहवालात तलाठी यांनी जलसिंचित रकान्यात “विहीर” अशी हाताने नोंद केली आहे, जी कामाच्या आदेशापूर्वीची असल्याने शासनाची दिशाभूल करणारी आहे. त्यामुळे मुंबई वित्तीय नियम 1959 मधील नियम 58 व अनुक्रमांक 5 चे उल्लंघन करून रुपये 1,53,741/- चे केलेले प्रदान वसूल करणे आवश्यक आहे.

3. अ) श्री दिगांबर गणपत धारगावे, पचखेडी यांच्या अर्जाची तपासणी केली असता अर्जासोबत जोडलेल्या अहवालानुसार गाव नमुना 7/12 वर सरकारी कालवा असून जलसिंचित खरीप भात 0.6700 हे. क्षेत्राखाली असल्याचे नमूद आहे. तसेच सिंचन विहिरीचे बांधकाम 17/03/2022 रोजी पूर्ण झाल्यानंतर लाभार्थ्याने सादर केलेल्या 29/03/2022 च्या 7/12 उताऱ्यात तलाठी यांनी जलसिंचित रकान्यात "विहीर" अशी नोंद करून पिक घेण्याबाबत उल्लेख केला आहे.

ब) श्री जयपाल जयचंद शेंडे यांच्या नस्तीची तपासणी केली असता अर्जासोबत जोडलेल्या 7/12 उताऱ्यात जलसिंचनाचे साधन सरकारी कालवा असून जलसिंचित क्षेत्रात भाताचे 0.9200 हे. बारमाही पीक असल्याचे नमूद आहे. विहीर बांधकामानंतर प्राप्त 7/12 मध्ये विहीरची नोंद असून गाव नमुना 12 मध्ये जलसिंचित क्षेत्रात भाताचे 0.9000 हे. बारमाही पीक घेता येईल असे नमूद आहे. योजनेपूर्वी अधिक पीक क्षेत्र असूनही विहीर बांधकामानंतर कमी क्षेत्र दर्शविल्याने तलाठी यांनी दिलेल्या 7/12 अहवालाची सत्यता पडताळणी करणे आवश्यक आहे.

**4.494 जिल्हा परिषद स्वनिधी अंतर्गत शेतकऱ्यांना 75 टक्के अनूदानावर सेंद्रीय खताचा पुरवठा करणेबाबत. पंचायत समिती चिमुर, जिल्हा चंद्रपूर सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 5)**

पंचायत समिती चिमूर यांनी सन 2021-22 मध्ये जिल्हा परिषद स्वनिधी कृषी विभाग अंतर्गत शेतकऱ्यांना 75 टक्के अनूदानावर सेंद्रीय खताचा पुरवठा करणे करीता एकुण 30 लाभार्थ्यांना 450 बॅग प्रत्येकी रुपये 345/- प्रमाणे रक्कम रुपये 1,55,250/- प्रदान केले आहेत. याबाबत पुढीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. कृषी विकास अधिकारी लाभार्थी निवड यादी पत्रानुसार प्रती लाभार्थी 10 बॅगचे अनूदान देणेचे असताना प्रत्यक्षात 11 लाभार्थ्यांना 15 बॅग प्रमाणे अनुदान दिल्याने जादा अनूदान रुपये 18,975/- संबंधीतांकडून वसूल करणे आवश्यक आहे.

2. एकाच कुटुंबातील सदस्यांना लाभ दिल्याने इतर लाभार्थी या योजनेपासून वंचित ठेवण्यात आल्याचे लेखापरीक्षणात निदर्शनास आले आहे.

3. प्रत्यक्षात पंचायत समिती अंतर्गत 93 ग्रामपंचायती असताना फक्त 13 गावातील लाभार्थ्यांना या योजनेअंतर्गत लाभ दिल्याने योजनेची भौगोलिक दृष्ट्या समप्रमाणात तसेच व्यापत प्रमाणात अंमलबजावणी न केल्याने इतर ग्रामपंचायती अंतर्गतचे लाभार्थी लाभापासून वंचित राहिल्याचे दिसून येते.

4. सदर योजना ग्रामिण भागातील शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी आहे. परंतु लाभार्थी गुलाब भिसी नगरपंचायत नागरी क्षेत्रातील असून नागरी क्षेत्रातील लाभार्थ्याला लाभ दिल्याने प्रदान रक्कम रुपये 5,175/- रक्कम वसूल करणे योग्य ठरते.

5. सर्व लाभार्थ्यांनी खत दिनांक 25/03/2022 रोजी एकाच दिवशी एकाच ठिकाणावरुन मॉ दुर्गा इंटरप्रायजेस, नवेगाव पेठ या पुरवठादाराकडून खरेदी करणे तसेच एकाच दिवशी मौका तपासणी अहवाल करून तसा अहवाल देणे या सर्व बाबी एकाच दिवशी घडून येणे संशयास्पद आहे.

6. बिलामधील साहित्याचे विवरण, दर व टॅक्सेस यांची नोंद छापील आहे, परंतु लाभार्थ्याचे नाव, बिल क्रमांक व दिनांक हे हस्तलिखीत असल्याने बील अगोदरच बनविण्यात येवून फक्त पंचायत समितीला सादर केल्याचे दिसून येते.

7. बिलावरील जिएसटी क्रमांक 27DHCPK2189G1Z8 दिनांक 01.11.2021 पासून निष्क्रीय आहे त्यामुळे प्रदान केलेली जीएसटी ची एकुण रक्कम रुपये 27,000/- संबंधितांकडून वसूलपात्र आहे.

8. मौका चौकशी प्रमाणपत्रावर दिनांक तसेच खत योग्य प्रकारचे असल्याबाबत अधिकाऱ्यांची दौरा दैनंदिनी जोडण्यात आली नसल्याने प्रत्यक्षात विस्तार अधिकारी यांनी सदर चौकशी केल्याची खात्री होत नाही. निधी प्राप्त असताना प्रत्यक्षात योजना दिरंगाईने राबवली आहे.

9. पुरवठा धारक नोंदणीकृत व अधिकृत असल्याची पडताळणी कृषी/लेखा विभागाने केल्याचे दिसून येत नाही.

10. लाभार्थी यांचा सातबारा जोडला नसल्यामुळे शेती असल्याची खात्री न करताच योजनेचा लाभ देण्यात आल्याचे दिसून येते. तसेच लाभार्थी निवडीचे निकष तसेच साहित्याचे स्पेसीफीकेशन ठरविले नसल्यामुळे योग्य लाभार्थ्यास लाभ दिल्याची पडताळणी होत नाही. योजनेंतर्गत एकूण 36 लाभार्थ्यांकारिता निधी असताना 30 लाभार्थ्यांना लाभ दिल्याने व निधी शिल्लक असतानाही 6 लाभार्थ्यांना लाभ मिळू शकला नाही.

11. सेंद्रीय खत शेती कामात खरीप किंवा रबी हंगामात वापरतात त्यामुळे या कालावधीत योजना राबविणे आवश्यक असताना मार्च महीन्यात राबविल्यामुळे खते चार ते पाच महीने पडून राहून खतांची परिणामकारता काळानूसार कमी होते.

12. शासनाने ठरवलेल्या निकषाप्रमाणे 10 टक्के महीला व 5 टक्के अपंग सर्व घटकांची निवड न केल्यामुळे योजनेच्या लाभापासून वंचीत राहिल्याचे दिसून येते.

### 4.495 डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन विशेष घटक योजने अंतर्गत केलेल्या विहीर बांधकामातील अनियमितता बाबत.

**पंचायत समिती पैठण, जिल्हा छत्रपती संभाजीनगर, सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 10)**

पंचायत समितीने सन 2021-22 मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन विशेष घटक योजनेंतर्गत विहीर बांधकामावर प्रति लाभार्थी रुपये 2,50,000/- प्रमाणे 48 लाभार्थ्यांसाठी रुपये 1,20,00,000/- तसेच विहीर दुरुस्तीवर रुपये 50,000/- प्रमाणे 3 लाभार्थ्यांसाठी रक्कम रुपये 1,50,000/- असा एकूण रक्कम रुपये 1,21,50,000/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य पुणे यांचे पत्र क्रमांक विप्र-7/डॉ.बा.आं.कृ.स्वा.यो/मासु/19-20/2228 दिनांक 18/07/2019 मधील मार्गदर्शक सूचना परिच्छेद क्रमांक 4 नुसार तालुका स्तरावर योजनेस व्यापक प्रसिध्दी दिली नाही.

2. ग्रामविकास विभाग, परिपत्रक क्रमांक मागास/1089/प्र.क्र.-55/34, दिनांक 05/10/1989 नुसार लाभार्थीची गावनिहाय मास्टर नोंदवही ठेवली नाही त्यामुळे दुबार लाभाची शक्यता नाकारता येत नाही.

3. उपरोक्त मार्गदर्शक सूचना मधील परिच्छेद क्रमांक 3.4 नुसार सदर योजनेचा लाभ घेतलेल्या लाभार्थ्यांच्या 7/12 उताऱ्यावर विहीरीची नोंद घेण्यात आली नाही.

4. उपरोक्त दिनांक 18/07/2019 च्या मार्गदर्शक सुचना क्रमांक 5(ए) नुसार वैयक्तीक लाभार्थी निवडताना महिला व अपंग लाभार्थ्यांना प्राधान्य देण्यात यावे व मंजुर निधी पैकी 3 टक्के निधी अपंग लाभार्थ्यांकरीता राखून ठेवण्यात यावा, असे लाभार्थी प्रयत्न करुनही उपलब्ध न झाल्यास तसे अभिलेखे संग्रही ठेवून इतर शेतकऱ्यांना लाभ द्यावा, अशी अट असताना त्यानुसार कार्यवाही केली नाही.

5. सदर योजना राबविल्यामुळे अनुसूचित जातीचे/अनुसूचित जमातीचे शेतकरी आर्थिक दृष्टया स्वावलंबी बनल्याबाबत फलश्रुती अहवाल लेखापरीक्षणास उपलब्ध झाला नाही.

*****